**प्रेसनोट** **दि.२०/०६/२०१९**

**कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**<u>मसाज सेंटरमध्ये वेश्या व्यवसाय उघड, पर राज्यातील मुलींची सुटका</u>**

दि.२०/०६/२०१९ रोजी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.मदन बहाद्दरपुरे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, लिबर्टी सोसायटी, ओशनिक स्पा, पहिला मजला, कोरेगाव पार्क, पुणे येथे मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय केला जात असून त्यासाठी गिऱ्हाईकामागे दोन ते तीन हजार रुपये घेतले जातात. सदर स्पा सेंटरमध्ये थेरपीस्ट मुली मसाज करण्यासाठी ठेवलेल्या असून त्यांना ज्यादा पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत असल्याबाबत खात्रीशीर बातमी मिळाल्याने, पोलीस स्टेशन कडील अधिकारी व स्टाफ व पंचासह लिबर्टी सोसायटी, ओशनिक स्पा, पहिला मजला, कोरेगाव पार्क, पुणे येथे जावून छापा घातला असता छाप्यामध्ये राज्यातील व परराज्यातील चार पीडित मुली मिळून आल्या. सदर मुलींकडून नमूद स्पामधील मॅनेजर के हिगबा सायमन, रा.ताडीगुत्ता चौक, धायरकर वस्ती, मुंढवा, पुणे. मूळ गाव मरम मशाक सगाई, राज्य मणीपूर व नमूद स्पाचे मालक धनराज पूर्ण नाव पत्ता माहित नाही हे वेश्या व्यवसाय करवून घेत असल्याचे व सदर मुली हया गरीब घरातील असल्याचे समजल्याने व त्यांचे गरीबीचा फायदा घेवून, त्यांना पैशाचे आमिष दाखवून त्यांचेकरवी वेश्या व्यवसाय करून घेत असताना मिळून आल्याने वर नमूद स्पा मालक व त्याचा मॅनेजर यांचेविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व नमूद पीडित मुलींची वेश्या व्यवसायातून सुटका करण्यात आलेली आहे व नमूद पीडित मुलींना रेस्क्यु फाऊंडेशन, हडपसर, पुणे येथे संरक्षणकामी ठेवण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई ही मा.श्री.बच्चन सिंग सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे व त्यांचे पथकाने केलेली आहे.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे